लोकमत



डी. वाय पिंपरीमध्ये सायबर सुरक्षा अभियान राबविण्यात आले.

# 'डीवाय'मध्ये राबविले सायबर सुरक्षा अभियान

लोकमत न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** डॉ. डी. वाय. पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयामध्ये सायबर सुरक्षा अभियान राबविले. डॉ. डी. वाय. पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या संगणकशास्त्र विभाग व क्विक हिल फाउंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर सुरक्षा अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये महाविद्यालयाच्या ३८ स्वयंसेवकांनी वेगवेगळ्या शाळेमध्ये जाऊन २२ हजार ३५८ हजार विद्यार्थ्यांपर्यंत सायबर सुरक्षा बद्दल माहिती दिली. उपप्राचार्य डॉ. किशोर निकम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या उपक्रमाचे आयोजन प्रा. डॉ. सुजाता पाटील व प्रा. विद्या बनकर यांनी केले. संस्थेचे अध्यक्ष डॉ. पी. डी. पाटील, सचिव डॉ. सोमनाथ पाटील, प्राचार्य डॉ. रणजीत पाटील यांनी उपक्रमाचे कौतुक केले. (वा. प्र.)